
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2024
सकाळ

# संशोधकाने संशोधनाचे केंद्रबिंदू बदलत राहिले पाहिजे : डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. १९ : ''संशोधकाने संशोधनाचे केंद्रबिंदू बदलत राहिले पाहिजे,'' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित पीएच.डी. मार्गदर्शक आणि विद्यार्थी मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत होते.



ते म्हणाले, ''आपले संशोधन हे पुढच्या पिढीने संदर्भ म्हणून वापरले पाहिजे एवढे ते दर्जेदार झाले पाहिजे. तसेच संशोधनात संशोधकाने वाचन, चिंतन केले पाहिजे.'' प्रा. रणधीर शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठातील पूर्व संशोधनाचा आढावा घेतला. संशोधनाची परंपरा सांगितली तर विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, ''संशोधनात संख्यात्मक दर्जापेक्षा गुणात्मक दर्जा वाढला पाहिजे. तसेच त्यांनी आजच्या संशोधनाच्या सद्य:स्थितीवर भाष्य केले.''

कार्यशाळेत डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. अनिल गवळी, डॉ. गोविंद काजरेकर, डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी संशोधनाची दृष्टी, संशोधनाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप, प्रबंध मांडणी : शिस्त आणि नैतिकता, प्रबंध विषय : जबाबदारी आणि आवश्यक काळजी, संशोधन साधने वापरण्याचे कौशल्य यावर मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयातील दोनशेहून अधिक पीएच. डी. मार्गदर्शक आणि संशोधक विद्यार्थी सहभागी झाले. भक्ती नाईक यांनी सूत्रसंचालन तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2024
तरुण भारत

# संशोधनाचे केंद्रबिंदू बदलत राहावे

## ▪ कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

संशोधकाने संशोधनाचे केंद्रबिंदू बदलत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डि. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित पीएच. डी. मार्गदर्शक आणि विद्यार्थी मार्गदर्शन कार्यशाळेत उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

डॉ. म्हणाले, आपले संशोधन हे पुढच्या पिढीने संदर्भ म्हणून वापरले पाहिजे एवढे ते दर्जेदार झाले पाहिजे. तसेच संशोधनात संशोधकाने वाचन, चिंतन केले पाहिजे. प्रा. रणधीर शिंदे यांनी आपल्या मनोगतात शिवाजी विद्यापीठातील पूर्व संशोधनाचा आढावा घेतला. सशोधनाची परंपरा सांगितली. प्रास्ताविकात मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, संशोधनात संख्यात्मक दर्जापेक्षा गुणात्मक दर्जा वाढला पाहिजे. तसेच त्यांनी आजच्या संशोधनाच्या सद्यस्थितीवर भाष्य केले. कार्यशाळेमध्ये डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. अनिल गवळी, डॉ. गोविंद काजरेकर, डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी संशोधनाची दृष्टी विविध परिप्रेक्ष्य, संशोधनाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप, प्रबंध मांडणी, शिस्त आणि नैतिकता, प्रबंधविषय, जबाबदारी आणि आवश्यक काळजी, संशोधनसाधने वापरण्याचे कौशल्य या विषयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेसाठी शिवाजी विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयातील दोनशेहून अधिक पीएच. डी. मार्गदर्शक आणि संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते. सूत्रसंचालन भक्ती नाईक यांनी केले. आभार डॉ. सुखदेव एकल यांनी मानले.

20 OCT 2024
लोकमत

# संशोधनाचे केंद्रबिंदू बदलत राहिले पाहिजे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संशोधकाने संशोधनाचे केंद्रबिंदू बदलत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित पीएच. डी. मार्गदर्शक आणि विद्यार्थी मार्गदर्शन कार्यशाळेत उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, आपले संशोधन हे पुढच्या पिढीने संदर्भ म्हणून वापरले पाहिजे एवढे ते दर्जेदार झाले पाहिजे. तसेच संशोधनात संशोधकाने वाचन, चिंतन केले पाहिजे. प्रा. रणधीर शिंदे यांनी पूर्व संशोधनाचा आढावा घेतला. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. संशोधनात संख्यात्मक दर्जापेक्षा गुणात्मक दर्जा वाढला पाहिजे. तसेच त्यांनी आजच्या संशोधनाच्या सद्यस्थितीवर भाष्य केले. कार्यशाळेत डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. अनिल गवळी, डॉ. गोविंद काजरेकर, डॉ. गोमटेश्वर पाटील या मार्गदर्शक वक्त्यांनी संशोधनाची दृष्टी विविध परिप्रेक्ष्य, संशोधनाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप यावर मांडणी केली. भक्ती नाईक यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
20 OCT 2024
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सत्य, तथ्य पारखताना भान ठेवा

## डॉ. माया पंडित-नारकर; संशोधन पद्धतीविषयी विद्यापीठात कार्यशाळा



कोल्हापूर : कार्यशाळेत डॉ. माया पंडित यांचे स्वागत के. के. शर्मा यांनी केले. यावेळी डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. ए. एम. सरवदे.

कोल्हापूर, ता. १९: ''भाषेच्या संशोधकांनी पुस्तकांतील सत्य आणि तथ्यांची पारख करत असताना वास्तवाचे भान ठेवावे. समाजातील चुकीच्या घटनांवर भाष्य करण्याचे ज्ञान अवगत करावे. यासाठी समाज जाणिवाही टोकदार ठेवाव्यात,'' असे आवाहन हैदराबाद विद्यापीठाच्या माजी प्रभारी कुलगुरू डॉ. माया पंडित-नारकर यांनी केले.

पीएम-उषा योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन येथे 'संशोधन पद्धती' यावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. डॉ. पंडित यांनी पीपीटीद्वारे चार कविता आणि कथांविषयी संशोधन दृष्टी विकसित करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. के. के. शर्मा अध्यक्षस्थानी होते. समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी स्वागत केले. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी संशोधकांकडून होत असलेल्या सामान्य चुकांविषयी माहिती दिली. डॉ. ए. एम. सरवदे यांनी आभार मानले. दुसऱ्या सत्रात पुणे विद्यापीठातील मराठीचे डॉ. प्रभाकर देसाई यांनी समाजातील बदलांना अधोरेखित करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. तिसऱ्या सत्रात डॉ. एस. एस. सावंत यांनी संशोधकांनी वाचनातून वैचारिक प्रगल्भता वाढविण्याचे आवाहन केले.

डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. गीता दोडमणी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश मुंज, डॉ. सुखदेव एकल आणि णाल मोहिते यांनी परिचय करून दिला. प्रकाश निकम यांनी आभार मानले. इंग्रजी विभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने, विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांचे सहकार्य लाभले.

यावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. सी. ए. लंगरे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. एम. एस. वासवाणी, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. दीपक भादले, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. सुरेंद्र उपरे यांच्यासह मराठी, हिंदी, इंग्रजी आणि विदेशी भाषांचे संशोधक उपस्थित होते.

20 OCT 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सत्य, तथ्यांची पारख करताना वास्तवाचे भान ठेवावे

## माजी प्र. कुलगुरू डॉ. माया पंडित-नारकर; संशोधन पद्धतीविषयी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भाषेच्या संशोधकांनी पुस्तकांतील सत्य व तथ्यांची पारख करत असताना वास्तवाचे भान ठेवावे. समाजातील चुकीच्या घटनांवर भाष्य करण्याचे ज्ञान अवगत करावे. यासाठी समाज जाणिवा ही टोकदार ठेवाव्यात, असे आवाहन हैदराबाद विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरू डॉ. माया पंडित-नारकर यांनी केले.

पीएम-उषा योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठातील वि.स. खांडेकर भाषा भवन येथे 'संशोधन पद्धती' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. के. के. शर्मा होते.



**कोल्हापूर : विद्यापीठात संशोधन पद्धती विषयावर आयोजित कार्यशाळेत डॉ. माया पंडित यांचे स्वागत करताना के. के. शर्मा. सोबत डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. ए. एम. सरवदे. (छाया : पप्पू अत्तार)**

दिवसभरातील सत्रात पुणे विद्यापीठातील मराठीचे प्रा. डॉ. प्रभाकर देसाई, हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. एस. सावंत यांनी मार्गदर्शन केले. डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. गीता दोडमणी यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रकाश मुंज, डॉ. सुखदेव एकल व मृणाल मोहिते यांनी करून दिला. समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी स्वागत केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी संशोधकांच्या सामान्य चुकांविषयी माहिती दिली. डॉ. ए. एम. सरवदे, प्रकाश निकम यांनी आभार मानले. इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, विदेशी भाषा विभाग प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांचे सहकार्य लाभले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. सी. ए. लंगरे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. एम. एस. वासवाणी, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. दीपक भादले, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. सुरेंद्र उपरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2024
तरुण भारत

# समाज जाणीवा टोकदार ठेवा

**कोल्हापूर :** भाषेच्या संशोधकांनी पुस्तकांतील सत्य आणि तथ्यांची पारख करत असताना वास्तवाचे भान ठेवावे. समाजातील चुकीच्या घटनांवर भाष्य करण्याचे ज्ञान अवगत करावे. यासाठी समाज जाणिवा ही टोकदार ठेवाव्यात, असे आवाहन हैद्राबाद विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. माया पंडित-नारकर यांनी केले.

पीएम-उषा योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठातील वि.स. खांडेकर भाषा भवन येथे संशोधन पद्धती या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा शुक्रवारी पार पडली. या कार्यशाळेत डॉ. पंडित या उद्घाटक व प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. त्यांनी पीपीडीद्वारे चार कविता व कथांविषयी संशोधन दृष्टी विकसित करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. अध्यक्षस्थानी संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. के. के. शर्मा होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2024
पुढारी

# महर्षी वाल्मिकी यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, पर्यावरण अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. पल्लवी भोसले, डॉ. रचना इंगवले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2024
पुढारी

# 'आयात-निर्यात क्षेत्रात अनेक रोजगार संधी'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आयात व निर्यातविषयक उद्योगांमध्ये रोजगाराच्या अनेक संधी आहेत. कष्ट करण्याची तयारी असणाऱ्या युवकांनी जरुर यामध्ये उतरावे. त्यांना सर्वतोपरी सहकार्य व मार्गदर्शन करण्यात येईल, असे मत उद्यमी महाराष्ट्र संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. ओंकार हरी माळी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाचा समाजशास्त्र अधिविभाग, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस केंद्र आणि शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आयात-निर्यात' विषयावर विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

20 OCT 2001
लोकमत

# वाचनालये सुरू करा, वाचन संस्कृती जपा : व्ही. एन. शिंदे

बांबवडे : गावोगावी वाचनालये सुरू करून वाचन संस्कृती जोपासण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. थेरगाव (ता. शाहूवाडी) येथील राजर्षी शाहू सार्वजनिक वाचनालय यांच्यातर्फे आयोजित राजर्षी शाहू 'साहित्य गौरव पुरस्कार' वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शेकापचे भाई भरत पाटील होते.

20 OCT 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संघर्ष काळात पिचवर टिकणे महत्त्वाचे : जाधव

## 'तेंडल्या' चित्रपटाच्या स्क्रीनिंगला प्रतिसाद

कोल्हापूर : प्रतिनिधी

स्वप्नांच्या मागे धावताना संघर्ष काळात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्याला धीराने सामोरे जावे लागते. या काळात सचिन तेंडुलकरसारखे पिचवर टिकून राहणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन 'तेंडल्या' चित्रपटाचे दिग्दर्शक सचिन जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सतर्फे 'तेंडल्या' चित्रपटाचे स्क्रीनिंग करण्यात आले. यावेळी प्रेक्षकांशी त्यांनी संवाद साधला.



कोल्हापूर : प्रेक्षकांशी संवाद साधताना दिग्दर्शक सचिन जाधव.

जाधव म्हणाले, चित्रपट निर्मिती हे टीमवर्क आहे. कथा सांगताना ती छोटी किंवा मोठी नसते, तर ती नीट अभिव्यक्त करणे गरजेचे असते. त्यात सातत्य ठेवावे लागते. या प्रक्रियेत तुम्हाला धाडसाने काही निर्णय घ्यावे लागतात. यावेळी सचिन जाधव यांनी प्रेक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन, संकलन, संगीत, अर्थकारण याविषयी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले. याप्रसंगी चित्रपटातील कलाकारांचे स्वागत करण्यात आले.

कोल्हापुरातील चित्रपट दिग्दर्शक उमेश बगाडे, मयूर कुलकर्णी, डॉ. संजय तोडकर, चित्रपट परीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया, मराठी विभागाचे माजी प्रमुख डॉ. राजन गवस, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे सचिव डॉ. शशिकांत चौधरी, प्रा. विकास कांबळे, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार, मतीन शेख, डॉ. जयंत कार्तिक, अभिनेता दिग्विजय रोहिदास, प्रमोद कुलकर्णी, जितेंद्र देशपांडे, गायिका रंजन कुलकर्णी, दिग्दर्शक संकपाळ, अभिनेता राज पाटील उपस्थित होते. साक्षी वाघमोडे हिने सूत्रसंचालन केले. अनुप जत्राटकर यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2024
सकाळ

# संघर्ष काळात पिचवर टिकणे महत्त्वाचे : सचिन जाधव

## विद्यापीठात 'तेंडल्या' चित्रपटाचे स्क्रीनिंग

कोल्हापूर, ता. १९ : ''स्वप्नांच्या मागे धावताना संघर्ष काळात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्याला धीराने सामोरे जावे लागते. या काळात सचिन तेंडुलकरसारखे पीचवर टिकून राहणे महत्त्वाचे आहे,'' असे प्रतिपादन 'तेंडल्या' चित्रपटाचे दिग्दर्शक सचिन जाधव यांनी केले.



कोल्हापूर : 'तेंडल्या' चित्रपटाच्या स्क्रीनिंगवेळी संवाद साधताना दिग्दर्शक सचिन जाधव.

शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सच्या वतीने 'तेंडल्या' चित्रपटाचे स्क्रीनिंग केले. प्रेक्षकांशी त्यांनी संवाद साधला. जाधव म्हणाले, ''चित्रपटनिर्मिती हे टीम वर्क आहे. या प्रक्रियेत तुम्हाला धाडसाने काही निर्णय घ्यावे लागतात.''

मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. उमेश बगाडे, मयूर कुलकर्णी, डॉ. संजय तोडकर, चित्रपट परीक्षक डॉ. अनमोल कोठडिया, मराठी विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. राजन गवस, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे सचिव डॉ. शशिकांत चौधरी, प्रा. विकास कांबळे, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार, डॉ. जयंत कार्तिक, अभिनेता दिग्विजय रोहिदास, प्रमोद कुलकर्णी, जितेंद्र देशपांडे, रंजन कुलकर्णी, अभिनेता राज पाटील उपस्थित होते. डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील यांनी संयोजन केले. साक्षी वाघमोडे हिने सूत्रसंचालन केले. अनुप जत्राटकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2024
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित पीएच. डी. मार्गदर्शक व विद्यार्थी मार्गदर्शन कार्यशाळा झाले. कुलगुरू डॉ. डि. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्रा. रणधीर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. विभाग प्रमुख डॉ नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2024
पुण्यनगरी

# कमला कॉलेजमध्ये वाचन प्रेरणा दिन

कोल्हापूर : येथील ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात झाला. यानिमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन करणाऱ्या भित्तीपत्रकांचे अनावरण करण्यासह सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ. सुजय पाटील, उपप्राचार्य एम. एन. जाधव, प्रा. डॉ. विश्वनाथ तराळ, प्रा. अशोक पाटील, प्रा. डॉ. प्रवीण चौगले, प्रा. स्वाती कांबळे, प्रा. चिन्मयी सांगळे, प्रा. सारिका घाटे, ग्रंथपाल ऊर्मिला कदम, प्रा. उमेश केसरकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.